# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०३/०७/२०२४

D+ ०५/७/२४ 10:35

# प्रेसनोट
## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम
### प्रधानमंत्री टी.बी मुक्त भारत अभियान अंतर्गत निक्षय मित्र नोंदणीबाबत

संसर्गजन्य आजारांमुळे होणा-या मृत्युमध्ये क्षयरोगांमुळे समावेश प्रमुख १० आजारांमध्ये आहे. त्यामुळे संपूर्ण जगामध्ये व भारतामध्ये क्षयरोग आजारामुळे होणा-या मृत्युंचे प्रमाण लक्षणीय आहे.

क्षयरुग्णांना उपचार कालावधीमध्ये पुरेसा पोषक आहार मिळाल्यास रोग बरे होण्याचे प्रमाण वाढते व रोगामुळे होणारी अनुषंगिक गुंतागुंत टाळता येते. उपचाराखाली असलेल्या व सामाजिक साहाय्य मिळावे यासाठी संमती दिलेल्या क्षयरुग्णांना उपचार कालावधीमध्ये पोषण आहार व इतर साहाय्य मिळावे यासाठी मा. राष्ट्रपती महोदयांनी दिनांक ०९ सप्टेंबर २०२२ रोजी प्रधानमंत्री टी.बी मुक्त अभियानाची सुरुवात केली आहे केंद्र शासनाने क्षयरुग्णांना प्रति व्यक्ती, प्रति महिना आवश्यक खालीलप्रमाणे धान्य, कडधान्य, डाळी, तेल इत्यादी पोषण आहार निक्षयमित्राच्या माध्यमातून देण्याचे प्रयोजन आहे.

| Food Group | Quantity |
|---|---|
| Cereals (Wheat/Rice/etc) | 3 Kgs |
| Pulses, Groundnuts etc | 3 Kgs |
| Edible oil | 1 Kg |

| OPTION 1(Monthly Basis) | | |
|---|---|---|
| Food Groups | For adults | For Children |
| Cereals & Millets | 3 Kgs | 2 Kgs |
| Pulses | 1.5 Kg | 1 Kg |
| Vegetable Cooking oil | 250 gms | 150 gms |
| Milk Powder | 1 Kg | 750 gms |

| OPTION (Monthly Basis) | | |
|---|---|---|
| Food Groups | For adults | For Children |
| Cereals & Millets | 3 Kgs | 2 Kgs |
| Pulses | 1.5 Kg | 1 Kg |
| Vegetable Cooking oil | 250 gms | 150 gms |
| Milk Powder | 1 Kg | 750 gms |
| Eggs | 30 | 30 |

करिता मा. आयुक्त तथा प्रशासक, मा. अति. आयुक्त-१, मा. उप-आयुक्त(वैद्यकीय आरोग्य विभाग), उल्हासनगर महानगरपालिका, मा. आमदार, उल्हासनगर-३, रोटरी क्लब ऑफ सपना गार्डन, रेड क्रॉस हॉस्पीटल, आय.सी. आय.सी.आय बँक, उल्हासनगर, महानगरपालिकेचे अधिकारी वर्ग तथा कर्मचारी वर्ग, राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था हे निक्षय मित्र म्हणून साहाय्य करत आहेत. मा. आयुक्त, मा. अति. आयुक्त, मा. उप-आयुक्त(वैद्यकीय आरोग्य विभाग), मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनामुळे उल्हासनगर मेडिकल असोसिएशन यांच्या मध्यस्तीने दानशूर ग्रासिम इंडस्ट्रीज लि. युनीट, सेंच्युरी रेयॉन, शहाड, उल्हासनगर-१ यांच्या तर्फे CSR (Corporate Social Responsibility) निधीतून १०० क्षयरुग्णांना सहा महिन्यासाठी दत्तक घेऊन दिनांक ३/०७/२०२४ रोजी पोषण आहार वितरीत करण्यात आले आहे. तरी उल्हासनगर शहरातील औद्योगिक संस्था, सहकारी संस्था, राजकीय पक्ष यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, आपण निक्षय मित्र म्हणून नोंद करुन क्षयरुग्णांना दत्तक घेऊन वरील प्रमाणे पोषण आहार द्यावा, जेणेकरुन रोग बरे होण्याचे प्रमाण वाढेल. यासाठी https://reports.nikshay.in/FormalO/DonorRegistration या शासकीय पोर्टल वर तसेच शहर क्षयरोग अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत पी.पी.एम. को-ऑर्डिनेटर यांच्याशी दूरध्वनी क्र. 7028669923 ई.मेल dtomhumc@rntcp.org येथे संपर्क साधावा.

(छाया प्रकाश डोंगरे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
  - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

Scanned with OKEN Scanner